
# नितीकथा



मंगला दिघे

परी प्रकाशन

**नीतीकथा**

◆ ——————

© सुरक्षित

◆ ——————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

१. वचन दिले मी तुला ३
२. पूजा करतो मी परमेशाची ११
३. कशासाठी ? पोटासाठी १९
४. छाया... वटवृक्षाची ! २५
५. काय मागू तुला ? ३३
६. आज धन्य मी ! ४०
७. कुणा म्हणू मी गुरू ? ४६
८. एक दाणा पेरिता... ५३
९. तीर्थयात्रा ६०
१०. शिष्योत्तम ६६
११. बे दुणे चार ७२
१२. पंडित आणि डाकू ७९
१३. भेटला हरी मजला ८६
१४. 'तो' हरवल्याशिवाय 'ती'... ९४
१५. उद्‌मेघ ९९
१६. इदं न मम १०६
१७. तमसो मा ज्योतिर्गमय ११२
१८. बुभुक्षित १२०
१९. विश्वस्त १२७
२०. दान देता दो कराने १३५
२१. आम्रफल, त्याचं काय मोल ? १४१
२२. तुझं की माझं ? १४८
२३. सत्यव्रती १५५
२४. मूर्ती लहान कीर्ती महान ! १६३
२५. धनसंपदा १७०

✦✦

# वचन दिले मी तुला

सुफल राज्यातील मधुपूर हे एक लहानसं गाव. त्या गावातील कांचनमाला आणि कमलेश या दांपत्याची ही गोष्ट. त्यांचा व्यवसाय होता विणकराचा. कमलेश हा एक कुशल विणकर होता. त्याच्या घरी हातमाग होता. कमलेश आपल्या मागावर सुंदर वस्त्रे विणत असे. उत्तम प्रतीचा धागा वापरी. रेशमी वस्त्रेही विणी. त्याची पत्नी कांचनमाला त्याला विविध रंगांची गुंफण कशी घालावी हे सांगे. तोसुद्धा तिच्या सल्ल्याचा आदर करी. एकदा मयुरी आपल्या लहानग्या सुनंदनला घेऊन कांचनमालेकडे आली.

''ये मयुरी.'' कांचनमालेनं तिचं स्वागत केलं. ''काय हवंय तुला विणून ?''

''नाही गं, मी त्यासाठी नाही आले. या माझ्या सुनंदनचा जन्मदिवस आहे परवा कार्तिकी पौर्णिमेला. त्याचं आमंत्रण द्यायला आलेय. यायचं हं दोघांनी !''

''नक्की येऊ.''

मयुरी निघून गेली. दोन दिवसांनी सुनंदनच्या जन्मदिवशी कांचनमाला आणि कमलेश दोघंही गेले. आज सुनंदन एक वर्षाचा झाला होता. अनेक स्त्री–पुरुष, मुले जमली होती. सुनंदन तर बाळकृष्णासारखा दिसत होता. भुरभुर उडणारे त्याचे केस! त्याला मुकुट घातला होता. मुकुटात मोरपीस खोचलेलं होतं. हातात, गळ्यात पुष्पमाला होत्या. आपल्या बाल–लीलांनी त्यानं सगळ्यांना मोहवून टाकलं. सगळ्यांनी त्याला उचलून त्याचे पापे घेतले.

''मयुरी, गालबोट लाव गं बाळाच्या गालाला. तिटाचा एखादा काळा टिळा. दृष्ट लागेल कुणाची.'' पुष्पावती म्हणाली.

हळू आवाजात चंपावती बोलली, ''बाई मयुरी, एक सांगते ते ध्यानी घे हो. त्या कांचनमालेजवळ देऊ नकोस बाळाला.''

''का गं ?''

''अगं, निपुत्रिक नाही का ती ?''

''माझा नाही असल्या गोष्टींवर विश्वास. आज ना उद्या होईल तिला बाळ.''

त्या दोघींचा संवाद कांचनमालेनं ऐकला. ती दूर एका बाजूला जाऊन उभी राहिली. लग्नाला दहा वर्षे झाली होती. अजून तिच्या घरात बाळाची पावलं दुडूदुडू धावली नव्हती. तिला ही वाटायचं आपल्याला एक चिमुकलं बाळ असावं; पण मनात म्हणायची, 'देवाची इच्छा असेल तसं होईल.' ती सगळ्या बाळगोपाळांवर प्रेम करी. तिनं कधी कोणाचा द्वेष केला नव्हता; पण आता चंपावतीच्या बोलण्यानं ती दुखावली. तिला शोधत मयुरी आली.


''कांचनमाले, अगं सगळ्यांनी किती कौतुक केलं सुनंदनचं ! तू त्याला हातसुद्धा लावला नाहीस.''

''असू दे गं.''

''कांचनमाले, सुनंदनला घेतलं नाही तर मला खूप वाईट वाटेल.''

कांचनमालेनं सुनंदनला घेऊन त्याचे खूप लाड केले. त्याचे पापे घेतले. आणलेलं बाळलेणं त्याला चढवलं.

समारंभ संपला. सगळे आपआपल्या घरी गेले. कांचनमाला त्या दिवशी खूप दु:खी होती.




दुपारी राधाराणी तिच्या घरी आली. राधाराणी ही मधुपुरातील एक दायी होती. स्त्रियांची बाळंतपणं करण्याचा तिचा व्यवसाय होता. वयस्क होती, अनुभवी होती. तिला नगरीतून नेहमी बोलावणी येत.

''ये राधाकाकी.'' कांचनमालेनं राधाराणीला बसायला पाट दिला. गूळपाणी ठेवलं. वाकून नमस्कार केला.

''पोरी ! माझ्या या हातांनी पंचक्रोशीतल्या कितीतरी स्त्रियांची बाळंतपणं केलीत. माझी म्हातारीची मरण्यापूर्वी एकच इच्छा आहे गं.''

''मरणाची भाषा बोलू नकोस काकी. तुझ्या हातून अजून खूप ईशसेवा घडायची आहे.''

“त्यातलाच एक भाग म्हण हवं तर. तुझं बाळंतपण मला करायचंय.”



“ते कोणाच्या हाती आहे काकी ! ईश्वरेच्छा असेल तसंच घडणार ना ?”

“विष्णू डोंगरावरची मंगळाई नवसाला पावते. तुझ्यासाठी मी नवस बोललेय. माझ्या कांचनमालेला पुत्र होऊ दे. दोघांनाही दर्शनाला आणीन मी.”

“ठीक आहे.”

“आणि माझ्यासाठी तू काहीच करणार नाहीस ?”

“काय करू मी ?”

“तुला पुत्र झाला तर.... त्याचं पहिलं वेतन तू मला द्यायचंस.”

कांचनमाला हसली. हसतच तिनं मान डोलावली.

“तोंडानं बोल.”

“मला पुत्र झाला; तर त्याची पहिली कमाई मी तुला देईन.”

बोलाफुलाला गाठ ! राधाराणीचा नवस म्हणा की कांचनमालेला देव पावला म्हणा, खरोखरच तिच्या ठायी बाळाची चाहूल लागली. कांचनमाला मनोमन आनंदली. यशावकाश गणेश चतुर्थीला तिनं एका गुटगुटीत, गोजिरवाण्या बाळाला जन्म दिला. गणेश चतुर्थीला झाला म्हणून गणेशाचंच 'प्रथमेश' हे नाव ठेवण्यात आलं. बाळाला घेऊन राधाराणीनं आपला नवस फेडला. ती त्यांना मंगळाईच्या दर्शनाला घेऊन गेली.

“कांचनमाले, माझ्या मनीची इच्छा पूर्ण झाली बाई. आता उतारवयानं थकले मी. बाणपुरी माझ्या लेकाकडेच राहावं म्हणते.”

“ठीक आहे काकी, जशी तुझी इच्छा !” कांचनमाला म्हणाली. राधाराणी निघून गेली.

प्रथमेशच्या बाल-लीला बघण्यात कमलेश आणि कांचनमालेला दिवस अपुरा पडू लागला. हळूहळू प्रथमेश मोठा होऊ लागला. आता तो आठ वर्षांचा झाला. जात्याच तो

बुद्धिमंत होता. दिसायलाही देखणा होता. चार पोरात उठून दिसे. राजबिंड्या रूपानं आणि अंगाच्या शालीनतेनं साऱ्यांची मनं त्याच्या ठायी आकर्षित होत.

आता प्रथमेश आपल्या सोबत्यांसह खेळू लागला. तो सगळ्या मित्रांचा आवडता होता. त्याची संगत सगळ्यांना प्रिय होती.

एकदा सगळे मित्र दुपारच्या वेळी नदीकिनारी खेळायला गेले. त्यांचा लपंडावाचा खेळ रंगात आला होता. तेवढ्यात दूरवरून घोड्याच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला. खेळ राहिला एका बाजूला. लपलेल्या जागांवरून सगळे उठले आणि एकत्र जमा होऊन बघू लागले. टापांचा आवाज जवळ येऊ लागला. धुरळा उडाला. चार–पाच घोडेस्वार आले. ते घोड्यांवरून खाली उतरले. त्यातील एक व्यक्ती खूपच तेज:पुंज दिसत होती.

''अरे, हे तर सुफल राज्याचे नृपती व्यंकटेश महाराज.'' भानुदास म्हणाला. तो राजधानीला जाऊन आलेला होता. त्यानं महाराजांना ओळखलं.

सगळ्या मलांनी महाराजांना मुजरे केले.

''कोणतं गाव हे ?'' महाराजांनी विचारलं.

''मधुपूर.''

''आम्हाला नदी–तीरी थोडावेळ थांबून पुढच्या मुक्कामाला जायचंय.''

''महाराज, ही पलाशवृक्षाखालील जागा ठीक दिसतेय.'' महाराजांच्या सेवकांपैकी एक म्हणाला. ''इथे थांबू या.''

''ठीक आहे. अश्वांना दाणा–पाणी करा.''

सेवकांनी घोडे सोडून झाडांना बांधले. त्यांच्यापुढे चारा टाकला.

''काय रे पोरांनो, काय करत होता इथे ?''

''आम्ही खेळत होतो महाराज.''

''आणखी काय काय येतं रे तुम्हाला ?''

''महाराज, हा भानुदास छान छान गोष्टी सांगतो.''

''असं !''

''आणि महाराज, हा प्रथमेश आहे ना, हा सुंदर गातो.''

''अरे वा ! गाऊन दाखवतोस का रे पोरा ?''

''कोणाची रचना गाऊ महाराज ? की स्वत: रचू ?''

''म्हणजे ? तुला कविता रचता येते ?''

''थोडी बहुत येते.''

''मग रचतोस ?''

‘‘विषय सांगा.’’

‘‘तुला आवडणाऱ्या एखाद्या झाडावर कविता रचून म्हणून दाखवशील ? कोणतं झाड आवडतं तुला ?’’

‘‘कापशीचं.’’

राजा, त्याच्या या उत्तरानं भारावला आणि म्हणाला, ‘‘तर मग सांग काव्यात तुला कपाशीचं झाड का आवडतं ते.’’

क्षणभर विचार करून प्रथमेशनं मनात कविता तयार केली आणि गाऊन दाखवली. त्याच्या ठायी प्रतिभा होती. आवाजाची ही ईश्वरदत्त देणगी होती. त्यानं सुरुवात केली.

‘‘पृथ्वीवरी वृक्ष कित्येक असती
सुगंधी फुलांनी काहीच नटती
कुणा लागताती फळे ती रसांची
परंतु मला ओढ या कापसाची.’’

‘‘अरे वा ! पण कापसाची ओढ का बरं तुला ?’’ राजानं विचारलं. प्रथमेशनं काव्यात उत्तर दिलं.

‘‘याच्या कृपेने सगळेच जगती
लेवून वस्त्रे तनू झाकताती
थंडी असो वा ऊन भारी
कपाशीचे झाड उभेच दारी.’’

‘‘फारच छान ! एखाद्या आवडत्या पक्ष्याचं गाणं करता येईल ?’’

‘‘येईल की !’’

‘‘आवडता पक्षी कोणता ? मोर ? पोपट ? कोकीळ ?’’

‘‘यातील एकही नाही.’’

‘‘आश्चर्य आहे. मोराच्या शरीरावर किती रंग ! त्याचा पिसारा केवढा मनमोहक! हिरवागार पोपट, त्याची लाल चोच ! कोकिळा किती मधुर गाते ! यातला एकही पक्षी आवडत नाही तुला ?’’

‘‘उपयोग काय त्यांचा जगाला ?’’

‘‘मग तुझा आवडता पक्षी आहे तरी कोणता ?’’

‘‘कोंबडा.’’

‘‘का आवडतो ते सांगशील काव्यात ?’’

‘‘हो.’’

''कोंबड्याचा तुर्रा ऐटदार किती
ऐटीत टाकतो पावले अती
कुकूचकू करून देतो बांग
साऱ्या जगाला येते जाग
एक तरी पक्षी आहे का ऐसा ?
माझ्या बहुगुणी कोंबड्या जैसा
मोर, पोपट, कोकीळ यांचा
बडेजाव तो काय कामाचा ?''

''छान छान !'' सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. राजा तर फारच खूश झाला. एवढ्याशा त्या बालकवीकडे पाहून राजा भारावला.

''काय रे बाळ, माझं वर्णन करशील का ?''

''हो.''

''बघ हं, गाण्यात माझी स्तुती आली पाहिजे. मी या विस्तीर्ण सुफल राज्याचा स्वामी! प्रजा माझं गुणगान गाते. 'राजा असावा तर असा' असं सारे म्हणतात. येईल तुला अशी कविता करता ?''

प्रथमेशनं होकारार्थी मान डोलावून सुरुवात केली.

''सुफल राज्याचा राजा आहे थोर
साऱ्या प्रजेवर प्रेमळ याची नजर
प्रजेला बघतो पुत्रावाणी
गावी किती याची गुणांची गाणी
सुफल राज्याचा आहे हा स्वामी
परंतु लोक हो लक्षात घ्या तुम्ही
हा तर एक राज्याचा स्वामी
जगाचा स्वामी तो ईश्वर नामी
त्याच्यापुढे हा अगदीच लहान
जगाच्या स्वामीची कीर्ती महान
स्तुती करावी जगदीश्वराची
व्यर्थ करू नये अशा नृपाची
चूकभूल झाल्यास क्षमा असावी
प्रथमेशावर नाराजी नसावी.''

सगळ्यांना वाटलं, आता राजा रागावणार ! पण राजा गुणग्राही होता. त्याला त्या लहान बालकाचं कौतुक वाटलं. त्यानं त्याला राजधानीला आपल्याबरोबर नेलं. राजानं प्रथमेशला पाच हजार सुवर्णमुद्रा दिल्या. आपले दोन सेवक देऊन प्रथमेशची रवानगी केली.

घरी प्रथमेशचे माय-तात कांचनमाला आणि कमलेश वाट पाहत होते. राजदूताबरोबर आलेल्या प्रथमेशला पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. थोडी भीतीही वाटली. राजदूतांनी खुलासा केला. राजानं प्रसन्न होऊन प्रथमेशला पाच हजार सुवर्णमुद्रा दिल्याचं सांगितलं, आणि सुवर्णमुद्रांची थैली त्यांच्यासमोर ठेवली. ते बघून दोघांनाही आनंद झाला. पण क्षणभरात कांचनमाला म्हणाली, ''थांबा, या द्रव्यावर आपला अधिकार नाही.''

''म्हणजे ?'' कमलेशनं विचारलं.


''प्रथमेशची पहिली कमाई राधाकाकीला देण्याचं मी वचन दिलंय.''

''मग तर तिला हे द्रव्य ताबडतोब नेऊन दिलं पाहिजे.''

दुसरे दिवशी कांचनमाला आणि कमलेश प्रथमेशसह राधाराणीच्या गावी जाऊन पोहोचले. राधाराणी आता बरीच थकलेली होती.

''राधाकाकी...'' कांचनमालेनं हाक मारली.

''कोण ? कांचनमाला ? अगं ये. ये पोरी. पती आणि पोराला घेऊन आलीस होय ? या, या, सगळे आत या.'' राधाराणीनं सगळ्यांना बसायला सुखवासी अंथरली.



''हं बोला, म्हातारीची आठवण कशी काय आली ?''

''काकी, या घे, तुझ्यासाठी पाच हजार सुवर्णमुद्रा आणल्या आहेत.'' कांचनमालेनं सुवर्णमुद्रांची थैली राधाराणीसमोर ठेवली.

''पाच हजार सुवर्णमुद्रा ? बाई गं, कुठून आणलंत एवढं द्रव्य ? आणि मला कशाला देत आहात ?''

''काकी, तुला आठवतं, तू मला म्हणाली होतीस, तुझ्या पोराची पहिली कमाई मला दे. ही आहे याची पहिली कमाई.''

''पोर कमवायलाही लागलं ?''

कांचनमाला आणि कमलेशनं तिला सारं काही सांगितलं. प्रथमेशनं रचलेल्या आणि गाऊन दाखविलेल्या रचनांनी राजा कसा खूश झाला आणि त्यानं या पाच हजार सुवर्णमुद्रा कशा दिल्या, त्या त्यांनी तिच्यासाठी कशा आणल्या हे सारं सांगितलं.

''प्रथमेश आजीच्या पाया पड.'' कांचनमाला म्हणाली.

राधाराणीनं उचलून त्याला छातीशी धरलं. ''औक्षवंत हो बाळ.'' नंतर ती कांचनमालेला म्हणाली, ''पोरी, अगं ते गमतीनं म्हटलं होतं मी. तू खरंच धरलंस. हे द्रव्य घेऊन काय करू बेटा ? मला नको ते. मला म्हातारीला काय करायचंय !''

''काकी, तुला घ्यावंच लागेल. या धनावर तुझाच हक्क आहे.''

राधाराणीचा नाइलाज झाला. ''घेते गं बाई; पण मला एका गोष्टीत मदत करायचं वचन द्या.''

''बोल काकी.''

''मी राहतेय या बाणपुरात एकही चिकित्सालय नाही. रुग्णांना उपचारासाठी राजधानीला जावं लागतं. माझी इच्छा आहे की या द्रव्याचा उपयोग चिकित्सालय बांधण्यासाठी व्हावा. तिथे कायम एखादा वैद्य असावा. म्हणजे कोणाचीही गैरसोय होणार नाही. कराल ना एवढं ?''

दोघांनीही माना डोलावल्या. राधाराणीच्या इच्छेसाठी एक लहानसं पाच-सहा दालनांचं चिकित्सालय बांधण्यात आलं. रुग्णांना उपचार मिळण्याची कायमस्वरूपी सोय करण्यात आली. सारे नगरवासी खूश झाले. राधाराणीही प्रमुदित झाली.

धन्य ती वचनाला जागणारी कांचनमाला आणि धन्य ती परोपकारी राधाराणी !

✦✦